शालेय पोषण आहार योजनेंतर्गत खर्चाचे सुधारित दर लागू करण्याबाबत शुध्दीपत्रक.......

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः शापोआ- २०१७/प्र.क्र.१९०/एस.डी.३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक: २८ नोव्हेंबर, २०१७

संदर्भ :- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-२०१०/प्र.क्र.१८/प्राशि-४, दि.०२/०२/२०११

शुध्दीपत्रक :-

संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक ०२/०२/२०११ नुसार शालेय पोषण आहार योजनेंतर्गत खर्चाचे सुधारित दर लागू करुन मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. प्रस्तुत शासन निर्णयामध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत द्यावयाच्या पाककृतीचा तपशिल परिशिष्ट-अ मध्ये नमूद केला आहे. सदर तपशिलामध्ये विहित पाककृती नमूद करुन पाककृती निहाय तांदूळ व धान्यादी माल वापरण्याचे प्रमाण दिले आहे. सदर प्रमाणानुसार शिजविलेल्या आहाराचे वजन प्राथमिक गटासाठी २५० ते २७५ ग्रॅम व उच्च प्राथमिक गटासाठी ३७५ ते ४०० ग्रॅम एवढे राहील, असे नमूद केले आहे.

सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या तांदूळ व धान्यादी मालाचे प्रमाण वापरुन शिजविलेल्या अन्नाचे वजन प्रत्यक्षात केले असता, सदर वजन संदर्भाधिन शासन निर्णयात नमूद केलेल्या वजनापेक्षा जास्त येत असल्याने त्यामध्ये बदल करावा असा प्रस्ताव प्राथमिक शिक्षण संचालनालयाने शासनास सादर केला होता. त्यानुसार संदर्भाधिन शासन निर्णयातील परिशिष्ट-अ मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

अ) शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: २५० ते २७५ ग्रॅम एवढे राहील **त्याऐवजी** शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ४०० ते ४५० ग्रॅम एवढे राहील, असे वाचण्यात यावे.

ब) शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ३७५ ते ४०० ग्रॅम एवढे राहील **त्याऐवजी** शिजविलेल्या अन्नाचे वजन साधारणत: ७०० ते ७५० ग्रॅम एवढे राहील, असे वाचण्यात यावे.

सदर शुध्दीपत्रकातील बदल पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२८१५४३१५०१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pramod Abaji Patil

Digitally signed by Pramod Abaji Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4a3b99d57d257e955ed34ca51db1f3c52100255 5e05c455e86fa1c9c82a1d82b, cn=Pramod Abaji Patil
Date: 2017.11.28 17:14:07 +05'30'

(प्रमोद पाटील)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव
५. मा.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. मा.प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
८. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
९. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
११. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र ½, मुंबई/नागपूर.
१३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१४. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१५. शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद (सर्व)
१६. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई
१७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (अर्थसंकल्प / प्रशासन), मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती - एस.डी.३